2014-15

ISSN 2349-9370
Vol. I Issue I 2014





# Research Journal Of India

**(Multi-Disciplinary Annual National Research Journal)**



Dr. Bhau Mandavkar Research Centre
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445401 (India)

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | डॉ. आंबेडकर यांचे लोकशाहीधिष्ठित संसदीय विचार | डी.एस. पाटील | 98 |
| 24 | मर्ढेकरांच्या कवितेतील नवता | डॉ. संतोष विष्णू चतुर | 102 |
| 25 | भारतातील लिंग गुणोत्तराचा समाजावर प्रभाव | कु. एम.एम जगताप (द्वि) | 106 |
| 26 | मराठी संत वाङ्मयातील दुर्लक्षित संप्रदाय | डॉ. सी. वीरा मांडवकर | 111 |
| 27 | जागतिक आर्थिक मंदी आणि तिचे रोजगारावर होणारे परिणाम | कु. रेखा वाठ | 117 |
| 28 | जलसंपत्तीचा विकास आणि व्यवस्थापन | एन.व्ही. नरुले | 119 |
| 29 | माहितीसेवांमध्ये ग्रंथालयाची बदलती भूमिका | डॉ. जी.पी. उरकुंदे | 123 |
| 30 | जागतिकीकरणाचा शेतकऱ्यांवर होणारा परिणाम | कु. माधुरी पं. राखुंडे | 127 |
| 31 | वैदर्भीय संतकवी चोखामेळा – व्यक्तित्व आणि कवित्व | रा.तु. आदे | 131 |
| 32 | विदर्भाच्या मंद आर्थिक विकासाची सामाजिक–सांस्कृतिक कारणे | डॉ. बी.व्ही. राठोड | 134 |


# Research Journal Of India

Research Journal Of India is a Peer Review Annual Research Journal for Multi-disciplinary studies various faculties.

Vision and Mission of Research Journal is to provide momentum to research in the areas like analytical, competitive, survey, contemporary issues and quality control.

Call for Research Paper

1. Paper on all subjects and areas will be accepted in English, Hindi or Marathi.
2. Paper should be **A 4** size with 1.25 inch margin on left and right side, 1 inch on Top and bottom.
3. Text should be in **Times New Roman** type wit 11 font size in English and **Krutidev 50** type with 14 font size for Hindi/Marathi and should be computed in MS word 2007.
4. Font size for Title of Paper 22 bold for English and 28 bold for Hindi/Marathi, Name of Author in 12 bold & Subtitles in 14 bold for English, and 16 and 18 bold for Hindi/Marathi respectively.
5. Spacing should be single.
6. Figures should given in separate file, if necessary. All figures should be cited in the text in consecutive numerical order. Each figure should have concise and informative caption.
7. Tables numbered using Arabic numerals may be given on separate page of the end of manuscript, if necessary.
8. Maximum words limit is 2000. Abstract should be up to 200 words.
9. The first page should consist of title, name(s) of author(s) with designation, department or college with full address, contact numbers and mail id.
10. Authors have to send research paper in soft (CD) and hard copies with e mail on **marathipradhyapak@gmail.com**. PDF files will not be accepted other than special figures.
11. Editorial Board's Decision will be final.
12. The copyright of all accepted papers will vest with **Research Journal Of India.**
13. References list should be alphabetized in the last names of first author of each research paper.
14. International Guidelines for research paper are to be strictly followed.
15. Date of Publishing is 1st October each year and papers will be accepted up to 1st September.

❖❖❖

# जागतिकीकरणाचा शेतकऱ्यांवर होणारा परिणाम

– कु. माधुरी पं. राखुंडे
सहायक प्राध्यापक (वाणिज्य विभाग)
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ, भ्रमणध्वनी ९७६४९९२२६१

## प्रस्तावना –

आपल्या देशातील बहुसंख्य शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सतत दारिद्र्याची राहिली आहे. त्यांचे वर्षाचे वार्षिक उत्पन्न आणि वर्षाचा शेतीचा व जगण्याचा खर्च याची तोंडमिळवणी सुध्दा होत नाही. ज्या वर्षी चांगले पीक आले त्या वर्षअखेरीस एकुण उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असतो कारण ज्या वर्षी पीक चांगले आले त्या वर्षी त्याच्या मालाचा भाव पडलेला असतो. जुनी देणी, साठलेली कर्जे फेडावी लागतात. कमी पीक आले तर मग तोट्याचा भार अधिकच वाढलेला असतो. आणि दुष्काळाने नापिकी झाली तर मग शेतकऱ्यांचे अतोनात हाल होतात हे निर्विवाद सत्य आहे.

शेतीची ही अवस्था असल्यामुळे केवळ शेतीउत्पन्नावर जगणाऱ्या शेतकऱ्याला दरवर्षी कर्जे काढावी लागतात. ग्रामीण भागात सावकारी करणारे, जमिनी लुबाडणारे, सोसायटया बुडविणारे असे १५/२० टक्के श्रीमंत शेतकरी सोडले तर ८० ते ८५ टक्के शेतकऱ्याला शेती करण्यासाठी कर्जे काढावी लागतात. ही जमीन असणाऱ्यांची स्थिती आहे परंतु ज्यांच्याकडे जमीनच नाही अशा भूमीहीनांची व शेतमजुरांची स्थिती तर दयनीय आहे. हे भूमिहीन शेतमजूर हळूहळू ग्रामीण भागातून बाहेर ढकलले जातात आणि शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये गटाराच्या कडेकडेला गलिच्छ वस्त्यांमध्ये जगतात. अशा परिस्थितीत जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांवर काय परिणाम होईल याचा विचार क्रमप्राप्त ठरतो. प्रस्तुत शोधनिबंधात याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## संशोधनाची पद्धती –

प्रस्तुत शोधनिबंध लिहिताना पाक्षिक, साप्ताहिक, दैनिक तसेच दुय्यम स्वरूपात उपलब्ध प्रकाशित व अप्रकाशित साहित्याचा आधार घेतलेला आहे.

## गृहिते –

१. जागतिकीरणामुळे शेतकरी देशोधडीला लागलेला आहे.
२. शेतकरी आपला शेतमाल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत नेण्यास असमर्थ ठरतो.
३. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती पूर्वीपेक्षा ढासळली आहे.
४. शेतकऱ्यांच्या मालाला नेहमी पडता भाव मिळतो
५. शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत आहे.

## संशोधनाचा उद्देश –

प्रस्तुत संशोधनाचे उद्देश खालील प्रमाणे–
१. जागतिकीकरणाचे शेतकऱ्यांवर पडलेले प्रभाव अभ्यासणे.
२. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

## जागतिकीकरणाचा अर्थ –

दळणवळणाच्या क्षेत्रामध्ये गेल्या काही २० वर्षाच्या काळात जी क्रांती घडून आली त्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला मोठी गती मिळाली आहे. जगामध्ये खूप राष्ट्रे असली तरी प्रत्येक राष्ट्राच्या दृष्टिने जागतिकीकरणाचा अर्थ हा वेगळा आहे.विशेषत: भारतासारख्या देशामध्ये जिथे रोज पन्नास रूपये अथवा त्यापेक्षा कमी रूपये मिळविणारे नागरिक राहतात. ज्यांचे आयुष्य दारिद्ररेषेवरच आहे, जे बेरोजगार किंवा अर्धबेरोजगार आहेत, त्या देशाच्या दृष्टिने जागतिकीकरणाचा अर्थ निश्चितच वेगळा आहे.

**देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून व्याख्या** – ''राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे जगाच्या अर्थव्यवस्थेशी एकात्मीकरण'' म्हणजेच जागतिकीकरण होय.

## शेतीकर्ज, शेतकरी व देशाची गरज–

भारतात शेतीवर अवलंबून असणाऱ्या भारतीय लोकसंख्येचे प्रमाण जवळपास ७० टक्के असल्यामुळे शेतीसाठी कर्जपुरवठा सहज व स्वस्त व्याजदरावर होणे ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढत असल्यामुळे अन्नधान्ये व इतर शेतीउत्पादनात वाढ होणे अपेक्षित आहे. व ह्या सर्व केवळ शेतकऱ्यांच्या गरजा नसून त्या एकूण देशाच्या गरजा आहेत. हे सत्य लक्षात ठेवून या विषयीचे धोरण असायला पाहिजे. भारतीय शेती ही पावसावर अवलंबून आहे ठराविक अंतराने दुष्काळ येतो, नापिकी होते. या नापिकीतून कर्ज थकते. अगोदरचे थकले तरी पुन्हा कर्ज काढावेच लागते. म्हणून मग कर्जाची फेरमांडणी करणे, सवलती देणे, प्रसंगी कर्ज माफ करणे, व्याजदरात सवलत देणे आणि तत्सम उपाय योजना या शेतकऱ्यांच्या रास्त गरजा असतातच, तथापि त्या देशाच्या गरजा असतात. कारण शेतीउत्पादन ही देशाची गरज असते. शेतीकर्जासंबंधी परिणामकारक राष्ट्रीय धोरणे ही जर देशाची गरज आहे तर मग सरकारनेच अशी धोरणे निश्चित धरून त्याची अंमलबजावणी करायला पाहिजे. परंतु सरकारचे सध्याचे धोरण तर अर्थव्यवस्थेत कमीतकमी हस्तक्षेप करण्याचे आणि कमी करीत करीत हस्तक्षेप नष्ट करण्याचे आहे. १९९० पासून अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांच्या हितासाठी हस्तक्षेप न करण्याचे धोरण तेव्हापासूनच्या सर्वच सरकारांनी स्वीकारले आहे. केवळ देशांअंर्तगत बाजारावर नव्हे तर जागतिक बाजारांवर अर्थव्यवस्था सोपवली आहे. त्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत.

## कर्जपुरवठा –

स्वातंत्र्यपूर्व काळातही शेतकऱ्यांची स्थिती हलाखीची होती. खाजगी सावकारी होती. अडाणी शेतकऱ्यांना सावकार फसवत होते, लुबाडत होते, म्हणून सहकारी कर्जपुरवठा संस्था स्थापन करण्यात आल्या. खाजगी सावकाराच्या कचाटयातून शेतकऱ्यांना सोडवण्यासाठी सहकारी संस्था आल्या. स्वातंत्र्यानंतर या संस्था गतीने वाढल्या. महाराष्ट्रात सहकारी संस्थांचे जाळेच पसरले. सहकारी सोसायटया, जिल्हा सहकारी बँका, राज्य सहकारी बँका. भूविकास बँका इ. कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था सर्व क्षेत्रात स्थापन झाल्या. अलीकडच्या काळात चित्र पुन्हा उलट झाले आहे. सावकार बरा पण सहकार नको असे म्हाणायची वेळ आली आहे. सध्या शेतीव्याजाचे दर कोणत्याही इतर व्याजदरापेक्षा जास्त आहेत. एअर कंडीशन मोटारकार घ्यायला जाल तर मोटारकंपन्या जाहिरात देऊन ओरडून ओरडून सांगतात की , ''या गाडी तयार आहे, कर्जही तयार आहे आणि व्याजाचा दर शुन्य आहे.'' कलर टी. व्ही. , फ्रीज यासारख्या घरगुती उपकरणांसाठी कर्जावर व्याज ६ टक्के , घरासाठी कर्ज ८ टक्के अंबानी, टाटा, बिर्ला व यासारख्या इतर भांडवलदारांसाठी कर्ज ९ टक्के आणि शेतकऱ्यांसाठी मात्र कर्ज १२ टक्कयांपासून २२ टक्के व्याजाने दिल्या जात आहेत. परिणामत: आजही शेतकऱ्यांना सहकारी आणि इतर संस्थाच्या ऐवजी खाजगी सावकारांकडून नाइलाजाने कर्ज घ्यावे लागत आहे आज खेडोपाडी बँका गेल्या आहेत ग्रामीण भागात बचतीची सवय लागावी हा त्यामागचा उद्देश असला तरी ग्रामीण भागात निर्माण होणाऱ्या ठेवी ह्या ग्रामीण ठेवी ग्रामीण भागासाठी उपयोगात येतीलच याची शाश्वती नाही. १९६९ साली काही खाजगी भांडवलदारांच्या मालकीच्या बँकांचे राष्ट्रीयकरण झाले १९६९ साली ग्रामीण भागातील ठेवी व कर्जाचे प्रमाण ३७.६ टक्के होते. १९८४ साली ग्रामीण भागातील ठेवी व कर्जाचे प्रमाण ६८ टक्के झाले. नंतर खुली अर्थव्यवस्था स्विकारली. परिणाम असा झाला की ही ठेव कर्जाचे प्रमाण घटू लागले आणि घटता घटता हे प्रमाण २००२ साली ४१.८ टक्के एवढे घसरले आणि ही घसरण सतत वाढतच आहे. अशा प्रकारे खेड्यातील ठेवी गोळा करून ती शहरातील भांडवलदारांना कर्जरूपाने दिली आणि खेडयातील शेतकऱ्यांना कर्जासाठी खाजगी सावकारांकडे जाण्यास भाग पाडले.

## जागतिकीकरणाचे शेतकऱ्यांवर होणारे परिणाम –

देशातील एकूण कष्टकऱ्यांपैकी दोन तृतीयांश पेक्षा जास्त शेती क्षेत्रात काम करतात. छोटया शेतकऱ्यांची संख्या देशातील एकूण शेतकऱ्यांच्या ८० टक्के आहे. या शेतकऱ्यांची अगतिक अवस्था कळण्यासाठी एकच तपशील पुरे आहे आणि तो म्हणजे गेल्या काही वर्षापासून विविध राज्यांतून शेतकऱ्यांच्या

वाढत्या आत्महत्या होय. राज्यसरकारांनी या आत्महत्यांना अनिश्चित पाऊस , नैसर्गिक संकटे, विनाशकारी किटकांचा हल्ला वगैरे गोष्टीमुळे होणारे पिकांचे नुकसानच जबाबदार असल्याचे म्हटले आहे. पण भारतातल्या कष्टाळू शेतकऱ्यांनी वर्षानुवर्षे असे आघात सहन केले आहेत.अर्थातच त्यांच्या आत्महत्येला जबाबदार असणाऱ्या खऱ्या गोष्टी वेगळ्याच आहेत. जागतिकीकरणामुळे शेती व्यवसायातील भांडवली गुंतवणूक कमी होत चालली आहे याचा दुष्परिणाम सिंचन आणि इतर शेती सुधारणांमधील गुंतवणूकीवरही झाला आहे. देशाचे धोरण ठरवणाऱ्या नेत्यांचे शेतीकडे संपूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. ह्याचे उत्तम उदा. म्हणजे अगदी कमी पैशाची गुंतवणूक करून एकूण सिंचन क्षेत्र १२ टक्के म्हणजेच ९५ लाख हेक्टर एवढया मोठया प्रमाणात वाढवले जावू शकते या उपेक्षेमुळे भारतातील बहुसंख्य शेतकरी वर्ग आजही वरूणराजाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. याशिवाय आर्थिक सुधारणापर्व सुरू झाल्यापासून केंद्रात आलेल्या सर्व सरकारांनी खते, सिंचन, विजपुरवठा यांच्यावरील अनुदानांमध्ये कपात करायला सुरूवात केली आहे. एवढेच पुरेसे नाही म्हणून की काय, बँकाकडून शेतीक्षेत्राला जो कर्जपुरवठा होत होता त्यात देखील आता कपात केली जात आहे. व बँकांनी आपला नफा जास्तीत जास्त वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यासाठी त्यांनी शेतीक्षेत्राला देण्यात येत असलेली सवलतीची कर्जे हळूहळू बंद केली आहे. ह्याचा परिणाम म्हणून शेतकरी दिवसेंदिवस स्थानिक सावकारांकडून मिळणाऱ्या कर्जावरच जास्तीत जास्त अवलंबून राहू लागले आहेत. हे सावकार जबरदस्त व्याज वसूल करतात. अलिकडच्या काळात काही वर्षामध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपैकी बऱ्याचशया शेतकऱ्यांवर सावकार व व्यापारांचे प्रचंड कर्जे झाले होते हे उल्लेखनीय आहे.

भारताला कर्जे देणाऱ्या धनकोनी दिवाळखोर झालेल्या भारतीय अर्थव्यवस्थेवर आर्थिक सुधारणांच्या नावाखाली अनेक अटी लादल्या. त्याचाचए एक भाग म्हणजे आयएमएफ–डब्लूबी नी भारतीय शेतीक्षेत्रावर लादलेल्या अटी होय. या अटीमुळेच लाखो छोटया आणि गरीब शेतकऱ्यांची आर्थिक दुर्दशा झाली व त्यांच्यापुढे आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय राहीला नाही. तर हे आहे जागतिकीकरण तरीही, पाश्चिमात्य रक्तपिपासू जळवांचे समाधान झालेले नाही. अजून एक आर्थिक सुधारणा स्विकारण्यासाठी त्यांनी भारत सरकारच्या नाडया आवळल्या आहेत. ती म्हणजे शेतीमालाची आयात खुली करणे. ही भारतीय शेतकऱ्यांयाठी फाशीची शिक्षाच ठरली आहे.

दी इकॉलॉजीस्ट चे संस्थापक आणि पर्यावरण चळवळीतील विभूती एडवर्ड गोल्डस्मिथ यांनी जागतिकीकरणामुळे भारतीय शेतकऱ्यांवर होणाऱ्या परिणामांबद्दल काही विचार व्यक्त केले ते त्यांच्याच शब्दात–

''**भारतातील दोन तीन एकरापेक्षा कमी जमीन असलेले शेतकरी (जागतिकीकरणात) कसे काय टिकू शकतील?.. ते नाही टिकू शकणार. हे सर्व शहरांमधल्या झोपडपटट्यांकडे ढकलले जातील. झाडून सारे. आणि जेव्हा तुमचा छोटा शेतकरी वर्ग असा आयुष्यातून उठेल, तेव्हा तुमचे छोटे दुकानदार, विक्रेते आणि बलुतेदार लोकही उरणार नाहीत. हे सर्व जण उखडले जातील कारण त्यांचे अस्तित्वच मुळी शेतकऱ्यांवर अवलंबून आहे**''. अशा तऱ्हेने तुम्ही देशातील कोटयांवधी लोकांना देशोधडीला लावाल आणि त्यांना कंगाल बनवाल.

## सारांश

जागतिकीकरणामुळे महानगरात समृध्दीचा पूर कदाचित लोटलाही असेल, परंतु भारताच्या ८० टक्के लोकसंख्येचा हिस्सा असलेल्या ग्रामीण जनतेची क्रयशक्ती मात्र खूप घटली आहे. वातानुकुलीत अशा नवी दिल्ली आणि जिनेव्हा येथिल केबिनमध्ये बसून जे कोणी तथाकथित अर्थतज्ञ देशाचे आर्थिक धोरण ठरवितात त्यांना भारतातल्या ग्रामीण जनतेचे दु:ख कधीही कळणार नाही. भारतातल्या कोणत्याही महाविद्यालयात अर्थशास्त्राचे शिक्षण घेणाऱ्या सर्वसामान्य विद्यार्थ्याला मागणी आणि पुरवठयाचे जेवढे अर्थशास्त्र कळते तेवढे देखील या वातानुकूलीत केबीनमध्ये बसून देशाचे आर्थिक धोरण ठरविणाऱ्या नेत्यांना कळत नाही. कारण शेतीमालाची किंमत तोच योग्य प्रकारे ठरवू शकतो जो शेतीत राबतो. परंतू ज्यांचा शेतीचा व शेतमालाचा काहीच संबंध नाही तेच शेतमालाच्या किंमती ठरवितांना दिसून येतात. शेतीवर भरभरून बोलतात.

१९८९–९० पासून अमेरिकेच्या दबावाखाली देशाच्या सरकारने नवी अर्थनीती स्वीकारली. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण हे या नव्या अर्थनीतीचे पैलू आहेत. नव्या अर्थनीतीच्या अंमलबजवणीचा गेल्या वीस वर्षाचा आणि आताही चालू असलेला काळ याची साक्ष आहे.

काळाच्या या तिसऱ्या भागात शेतीक्षेत्राची दशा काय आहे? याचा विचार आज महत्वाचा ठरतो आहे. नवी नीतीची जेव्हा स्वीकारली तेव्हा ज्यांनी विरोध केला तेव्हा मात्र त्यांची चेष्टा करण्यात आली. देशात सुबत्ता

येईल, शेतीकरी सुखी होईल, ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होईल देशाचा कॅलिफोर्निया होईल अशी स्वप्ने दाखविली गेली होती. प्रत्यक्षात मात्र या स्वप्नांना घरघर लागलेली दिसते. नव्या अर्थनीतीच्या काळात शेतीक्षेत्रात काय घडले याचा विचार केल्यास असे म्हणावे लागेल की गेल्या १० वर्षात शेतकऱ्यांनी जेवढ्या आत्महत्या केल्या तेवढ्या आत्महत्या अगोदरच्या ६० ते ६५ वर्षात झाल्या नव्हत्या. आता ही वस्तुस्थिती मान्य करावी लागत आहे.

## निष्कर्ष –

१. भारतीय शेतकऱ्याला जागतिकीकरणाच्या परिणामांची किंमत चुकवावी लागत आहे.

२. भारतीय अर्थव्यवस्थेच्या दिर्घकालीन विकासाच्या संधीचा नाश होऊन राहिला आहे.

३. भारतीय अर्थव्यवस्था लुटारू बहुराष्ट्रीय कंपन्याच्या आणि त्यांच्या परकिय सरकारच्या ताब्यात देऊन टाकाव्या लागत आहे.

४. भारताची अन्नसुरक्षा धोक्यात आली आहे.

५ जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढीस लागल्या आहेत.

६. ग्रामीण भागातील शेतमालाला भाव मिळत नसल्यामुळे वाढत्या महागाईतही शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. परिणामत: त्यांचे जीवन अजूनही खालावलेले आहे.

७. देशाला बेचीराख करणाऱ्या दुष्काळ, अवर्षण आणि साथीच्या रोगांचा फैलाव होत आहे.

८. शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे व कर्जाचा भार वाढत असल्याने शेतकरी आत्महत्या वाढीस लागल्या आहेत.

९. आजही शेतकरी शेती करतांना निर्यातीचा विचार करून शेती करत नाही.

१०. देशातील राज्यकर्त्यांनी दीडदमडीसाठी आपला आत्मा विकला आहे.

## संदर्भ


१. व्यावयायिक पर्यावरण – डॉ आत्माराम पळनीटकर, दिनकर देशपांडे

२. जागतिकीकरण की नवी गुलामगिरी – नीरज

३. जागतिकीकरण की नवी गुलामगिरी – ॲडमिरल विष्णू भागवत

४. दैनिक – देशोन्नती, लोकसत्ता


❖❖❖